<u>नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०१० मधील निशाणी १७६ खालील आदेश</u>

<u>(शांताबाई सुतार वगैरे वि. शैनाज शेख व अन्य)</u>

(CNR No.MHSN080005692013)

प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांचे नावास कंस करुन त्यापुढे मयत असा शब्द लिहिणेस परवानगी मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ बाबु आप्पाण्णा नागराळे हे दिनांक १२.१२.२०२५ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी आजारी असल्यामुळे त्यांना न्यायालयात येणे शक्य झाले नाही. मयत प्रतिवादी क्र.१ यांना अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे वारस आहेत. त्यामुळे, प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

२. वादीतर्फे विधीज्ञांनी त्याच अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे सादर करुन योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ नि.१६८ कडे प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये बाबु आण्णाप्पा नागराळे हे दिनांक १२.१२.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस हे या दाव्याचे जरुरी पक्षकार झालेले आहेत. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. प्रतिवादीने दाखल केलेला नि.१७४ कडील विलंब माफीचा व दावावसान रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>**आदेश**</u>

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) वादी यांना निर्देश देण्यात येतात की, प्रतिवादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.04.04 10:58:31 +0530

जत.

दिनांक – ०१.०४.२०२६

**(प्रकाश चु. बछले)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
**जत**

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. B. Samalewale, |
| Court Name | : | Shri. P. C. Bachhale |
| Date of judgment/order | : | 01.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 01.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 04.04.2026 |